पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३८६ दिनांक - १७/०६/२०२२**

**कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**“ रस्त्यातुन बाजुला थांबण्यास सांगितल्याच्या रागातुन खुनाचा प्रयत्न करणारे अनोळखी आरोपी जेरबंद”**

दि.१२/०६/२०२२ रोजी फिर्यादी हे त्यांचे फर्निचर दुकान बंद करुन आश्रफनगर गल्ली नं.०८, अल्लाहु अकबर इमारतीच्या समोरुन जात असताना तेथे रस्त्यावर अनोळखी तीन ते चार इसम हे रोडवर आडवे थांबुन आपआपसात भांडणे करित होते. तेव्हा फिर्यादी यांनी सदर इसमांना रोडमधुन बाजुला थांबण्यास सांगितले. रोडमधुन बाजुला थांबण्यास सांगितल्याच्या रागातुन अनोळखी इसमांनी त्यांच्या आणखीन दोन ते तीन साथीदारांना बोलावुन घेवुन तलवारीने, दगडाने, लाथाबुक्यांनी मारहाण करुन, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता.

त्याबाबत त्यांनी **कोंढवा पोलीस ठाणे पुणे येथे गुरन.५९४/२०२२ भादवि कलम ३०७,१४३,१४७,१४८, १४९,५०४,५०६,४२७,आर्म ॲक्ट ४(२५) क्रिमीनल ॲमेटमेंन्ट ॲक्ट कलम ७** प्रमाणे तक्रार दिली होती. सदर गुन्हा करणा�या अनोळखी आरोपी यांचा शोध घेण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सरदार पाटील, पोलीस निरीक्षक,(गुन्हे)संजय मोगले, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),जगन्नाथ जानकर यांनी सुचना दिल्या होत्या.

सदर आरोपी याचा शोध तपासपथक अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,अनिल सुरवसे, सहा.पोलीस निरीक्षक,स्वराज पाटील, सहा.पोलीस फौज. असगरअली सैय्यद, पोलीस अंमलदार, गणेश चिंचकर, अमोल हिरवे, जयदेव भोसले, अभिजीत रत्नपारखी, राहुल रासगे, दिपक जडे असे शोध व गुप्त बातमीदाराच्या मार्फतीने माहिती काढत होते. तसेच रोडवरील लावण्यात आलेल्या सीसीटिव्हिची पाहणी करित होते. **सदर गुन्हा आरोपी नामे १)सोहिल नवाज शेख,वय-२५ वर्षे,रा.आश्रफनगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे २)सोमनाथ भाऊसाहेब सरतापे,वय-२२ वर्षे,रा.आश्रफनगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे ३)अरबाज इलियाज खान,वय-२३ वर्षे, रा.आश्रफनगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे** यांनी केला असल्याबाबत माहिती पोलीस अंमलदार दिपक जडे, जयदेव भोसले, राहुल रासगे यांना प्राप्त झाली होती.

सदर आरोपी यांचा शोध घेत असताना आरोपी हे आश्रफनगर येथुन पळुन जाणार असल्याची माहिती प्राप्त झाली असता आरोपी यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपी यांना सहा.पोलीस निरीक्षक,स्वराज पाटील यांनी अटक केली असुन त्याच्याकडे गुन्हा करणारे त्याचे इतर साथीदार यांच्याबाबत तपास चालु आहे. सदर अटक आरोपी यांच्या विरुध्द यापुर्वीही शरिराविरुध्द गुन्हे दाखल आहे.

दाखल गुन्हयाचा अधिक तपास पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-५,पुणे शहर व सहा.पोलीस आयुक्त, वानवडी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली,सहा.पोलीस निरीक्षक स्वराज पाटील हे करीत आहेत.

सदर कामगिरीबाबत मा.अमिताभ गुप्ता,पोलीस आयुक्त, मा.संदिप कर्णिक,सह.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कोंढवा पोलीस स्टेशनचे अभिनंदन केले आहे.



पुणे शहर पोलीस
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
कोंढवा पोलीस स्टेशन
दुरध्वनी क्रंमाक : ०२०-२६९३०७८०, ०२०-२६९३२०२०
पुणे पोलीस
कोंढवा पोलीस स्टेशन